# प्रकरण पहिले

# बाबाराव मुसळे यांचा वाङ्.मयीन परिचय

१) विषय निवडण्यामागची भूमिका.

२) संशोधनविषयक पध्दती.

३) बाबाराव मुसळे यांचे जीवनचरित्र.

४) बाबाराव मुसळे यांच्यावर झालेले जीवन संस्कार.

५) बाबाराव मुसळे यांना मिळालेले विविध पुरस्कार.

६) बाबाराव मुसळे यांचे कथालेखन.

७) बाबाराव मुसळे यांचे ~~कथा~~लेखन. कादंबरी लेखन

- समारोप.
- निष्कर्ष.
- संदर्भसूची.

## प्रकरण पहिले

# बाबाराव मुसळे यांचा वाङ्.मयीन परिचय

## १) विषय निवडण्यामागची भूमिका :—

१९८० नंतर मराठी साहित्यात दलित ग्रामीण साहित्याच्या सीमारेषावर लेखन करणारे विदर्भातले प्रतिभासंपन्न लेखक म्हणजे बाबाराव मुसळे होत बाबाराव मुसळे यांनी आपले प्रारंभीचे लेखन करण्यासाठी कथा हा वाङ्.मय प्रकार निवडला 'मोहरलेला चंद्र' हा त्यांचा पहिला कथासंग्रह होय. (१९९२) त्यानंतर १९९४ ला त्यांचा दुसरा कथा संग्रह 'झिंगु लिखु लिखु' प्रसिध्द झाला त्यांच्या 'हाल्या हाल्या दुधू दे' (१९८५) या कादंबरीची निवड 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी' म्हणून १९८५ साली मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांनी डॉ. आनंद यादव व डॉ. दत्तात्रय पुंडे यांच्या सहकार्याने झाली. १९८५ साली 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी' या स्पर्धात्मक उपक्रमात एकमेव पुरस्कृत झालेली ही कादंबरी होती हीच कादंबरी बाबाराव मुसळेंची पहिली कादंबरी होती. त्यानंतर 'पखाल' (१९९५) ही दुसरी कादंबरी या दोन्ही कादंबऱ्या वाचकप्रिय झाल्या. समीक्षकांनी रसिक—वाचकांनी या कादंबऱ्यांची दखल घेतली. हे दोन कथासंग्रह दोन कांदबऱ्या मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे या नामांकित प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या आहेत.

'वारुळ'(२००४) ही बाबाराव मुसळे यांची तिसरी कादंबरी 'सांकेत प्रकाशन, औरंगाबाद द्वारे प्रकाशित झाली. 'वारुळ' एक सामाजिक कादंबरी आहे. ग्रामीण भागातल्या मागासलेल्या, पिढयान पिढया दलित समजलेल्या मातंग समाजाच्या तीन पिढयांचे विदारक जीवनचित्रण या कादंबरीत लेखकाने रेखाटले आहे. या कादंबरीची व्याप्ती, अवकाश मोठा आहे. १९८० ते २००४ पर्यंतच्या सर्व घटना त्यांच्या बारीक सारीक तपशिलांसह मातंग समाजाच्या जीवन जाणिवांसह कादंबरीत येते. कादंबरीची व्याप्ती लक्षात घेता दोन भागात लेखक मुसळे यांनी तिचे लेखन केलेले आहे. कादंबरीच्या पहिल्या भागात मातंग

समाजातील पहिल्या पिढीला सोसाव्या लागणाऱ्या यातना, जगावे लागणारे अपमानित जिणे, गावकीची करावी लागणारी हलकी, सलकी कामे, पारंपारिक कामामध्ये पिढयानपिढया जीवन कंठणारा मातंग समाजाचे विस्तृत विवेचन येते. तर दुसऱ्या भागात मातंग समाजाच्या दुसऱ्या पिढीचे विवेचन लेखक करतो. ही दुसरी पिढी समाजाच्या उध्दारासाठी सदैव प्रयत्नशील असलेली, शिकलेली आहे. या पिढीला स्वत:च्या हक्कांची जाणीव झालेली आहे. स्वत:च्या हक्कांसाठी प्रस्थापितांसमोर आपले दु:ख बेडरपणे मांडणारी आहे. या पिढीला पारंपारिक समाज व्यवस्था त्यांना मान्य नाही स्वत:बरोबर आपल्या समाजाचा विकास परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यामातून करण्याचा प्रयत्न ही पिढी सतत करीत आहे. ग्रामीण भागातले समाजकारण, राजकरण यामध्ये सहभागी होऊन आपल्या समाजाच्या चळवळींच्या विकासात येणाऱ्या अडथळयांवर मात करु शकणारी ही दुसरी पिढी आहे. या दुसऱ्याच भागात मातंग समाजाची तिसरी पिढी येते. ही तिसरी पिढी शिक्षण घेऊन उच्च पदावर जावून समाजाचा विकास व परिवर्तनवादी चळवळीचे प्रतिनिधित्व करण्यास तयार होत आहे. समाजविकास व उन्नतीसाठी ही पिढी तयार होत आहे. लेखक मुसळे यांच्या मनात परिवर्तनवादी चळवळींची बीजे रुजल्याने दुर्लक्षित अशा समाजव्यथा, वेदनांचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न यशस्वीपणे 'वारुळ' कादंबरीत केलेला आहे.

'वारुळ' कादंबरीत समाज वास्तव येते मातंग समाजाच्या विकासाचा आलेख या कादंबरीत येतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर डॉ. बाबासाहेबांनी महारांना दिक्षा दिली ते बौध्द झाले. परंतु मातंग समाजाला आंबेडकर हे आपले नेते नव्हेत ते आपल्या जातीचे नाहीत असे वाटत होते. त्यामुळे मातंग समाज आंबेडकरांच्या परिवर्तनवादी चळवळीत सहभागी झाला नाही. म्हणून बौध्द समाजापेक्षा २०—२५ वर्षे मातंग समाजाचा विकास उशिरा झाला. मातंगांचा विकास होण्यासाठी १९८० साल उजाडावे लागले. डॉ. अण्णासाहेब भोपळे यांच्या नेतृत्वाखाली 'अखिल महाराष्ट्र मातंग संघ' ची मुंबई प्रदेशला स्थापना झाली याच्या शाखा प्रत्येक खेडयापाडयात पोचविण्याचे काम मातंग समाजातल्या शिकलेल्या, शिकत असलेल्या तरुणांनी केले या परिवर्तनावादी चळवळीच्या माध्यमातून मातंग समाजाने केलेला विकास व

त्याचा आलेख या कादंबरीत येतो. त्यामुळे आज २१ व्या शतकात मातंग समाजाचा सामाजिक दस्तऐवज म्हणून ही कादंबरी समीक्षकांकडून गौरविली गेली आहे. अनेक छोटया—मोठया समीक्षकांनी या कादंबरीची दखल घेतली आहे. या कादंबरीला छोटया—मोठया पुरस्कारांनी गौरविले आहे. म्हणून 'वारुळ' कादंबरी संशोधनासाठी निवडली आहे.

## २) संशोधनविषयक पध्दती :—

'वारुळ' ही सामाजिक कादंबरी असल्याने मराठी साहित्यात तिला अनन्यसाधारण महत्त्व आहे. समाज वास्तव मांडणारी, समाजवास्तवाचं भान असणारी कादंबरी म्हणून सर्व लेखक, रसिक, वाचक, समीक्षकांचं लक्ष तिने वेधून घेतले आहे. त्यामूळे 'वारुळ' चा अभ्यास करताना समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा वापर केला जाईल. 'वारुळ' कादंबरीत मातंग समाजाच्या परिवर्तनाचा इतिहास येतो. १९८० ते २००४ पर्यंतची मातंग समाजाची स्थितीगती कशी होती. समाज जीवन कसे होते. हे या कादंबरीतून उलगडत जाते. मातंग समाजाचे चालत आलेले पारंपरकि व्यवसाय, करावी लागणारी गावकीची हलकी—सलकी कामे, जगावे लागलेले अपमानित जीवन, त्यांचे राहणीमान, प्रथा, परंपरा, रुढी यांच्या गर्तेत अडकलेला समाज यांचे चित्रण बाबाराव मुसळेंनी जिवंत केलेले आहे. कुणबी—मातंग संघर्ष, मातंग—बौध्द संघर्ष, कुणबी—बौध्द संघर्ष 'वारुळ' मध्ये पहावयास मिळतो म्हणून 'वारुळ' चा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा वापर केल्याने मातंग समाजावर प्रकाश टाकला जाईल व त्यांच्या जीवनाचे कंगोरे समजतील.

लेखक या कादंबरीचे निवेदन स्वत:च करतो. त्यामुळे लेखकाचे व्यक्तिमत्व सतत कादंबरीत डोकावत राहाते. म्हणून लेखकाचे व्यक्तिमत्व जाणून घेण्यासाठी चरित्रात्मक संशोधन पध्दतीचाही वापर करुन 'वारुळ' कादंबरीचा अभ्यास करण्याचा संकल्प केलेला आहे.

कादंबरी हा वाड्.मय प्रकार इतर वाड्मय प्रकारासारख्याच परंतु पूर्णपणे वेगळा असणारा वाड्.मय प्रकार आहे. त्याचा विकास जर पाहिला तर

आपल्या प्राचीन साहित्यात कादंबरी या वाङ्मय प्रकाराची बीजे सापडतात किंवा बीजे शोधण्याचा प्रयत्न साहित्यातज्ञांनी केलेला आहे. कादंबरी हे नाव संस्कृत साहित्यातून मराठी वाड्.मयात आले असले तरी वाड्.मयाचा हा आधुनिक ललित प्रकार मात्र इंग्रजी साहित्याच्या सहवासाने मराठीत रुढ झालेला व विकास पावलेला दिसतो. 'कदंब' वृक्षापासून कादंबरी हे नाव आले. कादंबरी म्हणजे काल्पनिक गोष्टी, बाणभटटाच्या 'कादंबरी' पासून कादंबरी या लेखन प्रकाराला कादंबरी हे नामामिधान मिळाल्याचे दिसते. तरीही कादंबरीचा विकास झाला तो इंग्रजी साहित्यातच. इंग्रजी सत्तेमुळे भारतीयांना इंग्रजी साहित्याची ओळख झाली. "मराठीतील 'कादंबरी' या वाड्.मय प्रकाराला 'नॉव्हेल' हा प्रतिशब्द वापरला जातो. 'नॉव्हेल' या इंग्रजी संज्ञेपासून मराठीत कादंबरी शब्द आलेला आहे".[१] "नावल म्हणजे नवल समूह होय. नावंलात चमत्कारीक गोष्ट असते. ती गोष्ट वाचित असता सुरुवातीपासून शेवटपर्यंत आपल्याला नवल वाटते. अशा नवल वाटणाऱ्या गोष्टीला इंग्रजीत नॉव्हेल(Novel) शब्द वापरला जातो. नॉव्हेल ला चमत्कारीक गोष्टही म्हटले जाते. म्हणून मराठीत 'नॉव्हेल' सदृश्य लेखनाला 'कांदबरी' शब्द वापरतात. "कादंबरी' या शब्दाचा अर्थ आसव, मद्य, असा होतो. हे जसे प्रत्यक्षाचा विसर पाडणारे आणि कदाचित आल्हाददायक असते. तसे काहीसे कादंबरीचे स्वरुप असते. असे म्हणता येईल".[२] डॉ. किशोर सानप म्हणतात — "कादंबरी हा रचना प्रकार जरी मराठीत इंग्रजीवरुन रुढ झाला असला तरी कादंबरीची बीजे जुन्या गद्य वाड्.मयात आढळतात असे लीलाचरित्र, स्मृतीस्थळ, बखरी, माहिपतीकृत चरित्रे आदी".[३] ग्रंथात सापडतात अशा प्रकारे मराठीतील कादंबरीचा वाड्.मय प्रकार रुढ झाला. या कादंबरीच्या विश्वात काळानुसार थोडाफार बदल झालेला दिसतो. **कादंबरीचा विकास** — मराठीतील पहिली कादंबरी बाबा पद्मनजी यांची 'यमुनापर्यटन' (१८५७) कादंबरीचे स्वरुप वर्णनपर निबंधासारखे असून विधवांचे दु:ख येते. इंग्रजी, संस्कृत गोष्टींची भाषांतरे याच सुमारास मराठीत येऊ लागली. सुरुवातील मराठी कादंबरीत कृत्रिम,

नटवीभाषा, अदभूतरम्थता, रंजनपरता, सुखांत शेवट यामुळे कादंबरी बरीच लोकप्रिय होत गेली. यामध्ये 'मंजुघोष,' 'रत्नप्रभा', 'राजामदन' यासारख्या बऱ्याच कादंबऱ्या मराठीत झाल्या. भडक व्यक्तिदर्शन, अदभूतरम्य वातावरण, प्रणय व शृंगार या गोष्टींना कादंबऱ्यात प्राधान्य होते. यानंतर १८७१ मध्ये रा. भि. गुंजीकरांची 'मोचनगड' ही ऐतिहासिक कादंबरी प्रसिध्द झाली.

इंग्रजी शिक्षणामुळे वाङ्.मयाबरोबरच 'स्वातंत्र', 'समता' आणि 'बंधुता' या तत्वांचा परिचय सुशिक्षितांना झाला सामाजिक' सुधारणा, व्यक्तिस्वातंत्र्यविषयक विचार आगरकर अग्रलेखातून मांडू लागले याचा ह. ना. आपटेंच्या कादंबऱ्यावर परिणाम होऊ लागला. त्यातून 'मधली स्थिती', 'मी', 'यशवंत खरे' 'पण लक्षात कोण घेतो'. या सामाजिक कादंबऱ्या निर्माण झाल्या. यातून तत्कालीन समाजस्थितीचे दुष्ट रुढींचे, स्त्री दास्याचे परिणम कारक चित्रण आपटेंनी केले. सामाजिक कादंबऱ्या बरोबर ऐतिहासिक कादंबऱ्यांचेही लेखन केले. 'चंद्रगुप्त', 'वज्राघात', 'सुर्योदय', 'गड आला पण सिंह गेला', 'उषःकाल', 'रुपनगरची राजकन्या' यातून ऐतिहासिक सत्यकथाभास निर्माण करुन वाचकांना स्वातंत्र्याचा संदेश देण्याचा प्रयत्न ह. ना. आपटेंनी केला.

याच सुमारास ना. ह. आपटे यांनी 'अजिंक्यतारा', 'आनंदमंदिर', 'सुखाचा मूलमंत्र', 'वैभवाच्या कोंदणात', 'ऐरणीवरील हिरा' इ. कादंबऱ्या लिहिल्या. हरिभाऊनंतर मराठी कादंबरीचा प्रवाह वा. म. जोशींनी पुढे नेला. हरिभाऊंनी ज्या स्त्रीयांची दुःखे मांडली त्या स्त्रिया वा. म. जोशींच्या कादंबऱ्यात शिकू लागल्या 'रगिणी', 'आश्रमहारिणी', 'इंदू काळे, सरला भोळे, इ. कादंबऱ्यामधून स्त्री इच्छा, अपेक्षा, आकांक्षाचे, मनःसृष्टीचे प्राधान्याने चित्रण व कादंबरी रचनेचे नवे प्रयोग हे जोशीच्या कादंबरीचे वैशिष्टये आहे. यानंतर मामा वरेरकर यांनी 'धावता धोटा', 'फाटकी वाकळ', 'कुलदैवत' इ. कादंबऱ्यातून अनेक विषयांचे वर्गाचे दर्शन घडविले.

डॉ. श्री. व्यं. केतकरांनी कादबंऱ्यातून वेगवेगळया प्रश्नांची चर्चा केली. 'गोंडवनातील प्रियंवदा', 'परागंदा', 'गावसासू', 'ब्राम्हण कन्या', 'आशावादी' या

त्यांच्या कादंबऱ्या समाजशास्त्रीय दृष्टया मोलाच्या ठरतात. याच काळात शि. म. परांजपे, न. चि. केळकर यांनी उल्लेखनीय कादंबरी लेखन केले.

यापुढचे फडके — खांडेकरांचे कादंबरीचे युग. फडकेंनी साहित्याचे रंजन हेच ध्येय ठेवले. त्यामुळे त्यांच्या कादंबरीत कल्पना रम्यता आली. कादंबरीला बांधेसूदपणा, सफाईदार भाषा ही ना. सी. फडकंची देणगी होय. 'कुलाब्याची दांडी', 'जादूगार', 'दौलत', 'आटकेपार', 'कलंकशोभा', 'समरभूमी', इ. कादंबऱ्यात स्त्री—पुरुष, प्रणय—प्रेम हा विषय मांडून तंत्राला प्राधान्य देऊन कादंबरीला डौल दिला. 'कलेसाठी कला', या दृष्टीकोणाचा अंगिकार केला. वि. स. खांडेकर हे 'जीवनवादी', लेखक त्यामुळे त्यांच्या कादंबरी लेखनात सामाजिक प्रश्नांना अधिक महत्त्व आहे. 'हृदयाची हाक', 'कांचनमृग', 'दोन ध्रुव', 'उल्का', 'हिरवा चाफा दोन मने, पांढरे डाग', 'क्रौंचवध, 'रिकामा देव्हारा' इ. कादंबऱ्यातून समाजाबद्दलचे प्रेम, शोषितांबद्दलची सहानुभूती प्रंकट झाली आहे.

ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या 'मुक्तात्मा' पासूनच्या बहुतेक कादंबऱ्यातून उन्मादक शृंगाराची वर्णने आली. 'भंगलेले देऊळ', व 'शाप', या त्यांच्या उत्तम कादंबऱ्या. याच सुमारास पु. ल. देशपांडे यांनी कादंबरीस अनुभवाचा अस्सलपणा आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या 'बंधनाच्या पलीकडे', 'विशाल जीवन', 'काळी राणी सदाफुली', 'सुकलेले फुल' या कादंबऱ्या होत.

यानंतर विभावरी शिरुकरांनी वास्तवाला जवळ जाणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या 'हिंदोळयावर', 'विरलेले स्वप्न' या कादंबऱ्यातून वास्तवाबरोबरच मराठीत मनोविश्लेषण आले. असाच प्रयोग मर्ढेकरांच्या 'रात्रीचा दिवस', कादंबरीत केला आहे. वि. वि. बोकील, शांता शेळके, वसंत कवठेकर, द. र. कवठेकर आदिंनी कादंबरीत भर घातली.

दुसऱ्या महायुध्दानंतर वास्तव समाज जीवन चित्रणाला महत्व आले. विश्राम बेडेकरांनी 'रणांगण' (१९३९) मध्ये अनुभव व रुप याच्या अभिन्नत्वाचा प्रत्येय दिला. १९४०—४५ नंतर सर्व साहित्यात नव जाणिवा आल्या. महायुध्दांत मानवतेची वाताहत झाली. जुनी मूल्ये गेली, समाज गुंतागुतीचा बनला. विषमता, भावनाशून्यता वाढली. सहानुभूतीशून्य जीवनाचे उदास चित्रण साहित्यातून आले.

गुन्हेगार जमातीवर विभावरी शिरुरकरांनी लिहिलेली 'बळी' ही कादंबरी मराठीत महत्त्वाची ठरली.

र. वा. दिघेंची 'पाणकळा' (१९३९) प्रादेशिक जीवनाबरोबर मनोविश्लेषणाची दिशा कादंबरीने पत्करली. आशय व रुपात बदल झाला बोरकरांनी 'भावीण' मधून भावीणीचे चित्रण केले. र. वा. दिघे, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर इ. नी प्रादेशिकतेचा प्रवाह कादंबरीत आणून सोडला. माडगुंळकरांची 'बनगरवाडी' उध्दव शेळकेंची 'धग', याच काळात प्रसिध्द झाली तर रणजित देसाई यांनी भूतकाळातील व्यक्तिचित्रे रेखाटली. त्यांच्या 'स्वामी', त्यामध्ये ना. स. इनामदार यांच्या 'झुंज', 'झेप' गंगाधर गाडगीळांची 'दुर्दम्य' या सारख्या कादंबऱ्यातूनही भूतकालीन व्यक्तिचित्रण केलेले दिसते. भालचंद्र नेमाडयांची 'कोसला' मधून जीवनाचा भंकसपणा, अर्थशून्यता याची जाणिव करुन दिली. स्वातंत्र्यानंतर मराठी कादंबरीचा विकास होत गेला. इ. स. १९६० नंतर कादंबरीत परिवर्तने झाली. यांच्यातून 'ग्रामीण' व 'दलित साहित्यप्रवाह आला. त्यातून ग्रामीण दलित जीवनाचे चित्रण होऊ लागले. त्यामध्ये 'पाचोळा', 'गोतावळा', 'फकिरा', 'माहिमची खाडी', 'हकिकत आणि जटायू' या महत्वाच्या कादंबऱ्या ठरतात. स्वातंत्र्यानंतरच्या कादंबरीत दलित कादंबरी महत्त्वाची ठरते.

**<u>दलित कादंबरी :—</u>**

कथा, कविता, आत्मकथा यांच्यापेक्षा दलित कादंबरीचे लेखन कमी झाले. तरी दलित लेखकांनी पाऊणशेच्यावर कादंबऱ्या लिहिल्या खऱ्या अर्थाने दलित कादंबरीला सुरुवात अण्णाभाऊ साठेंनी केली. दलित कादंबरीला कम्युनिष्ठ विचारांचे असूनही त्यांनी समृध्द केले. कादंबरीतून दलित माणसाचे मत व्यक्त केले. त्याचे नायक बेडर, बंडखोर, ध्येयनिष्ठ आहेत. अण्णाभाऊंच्या 'चित्रा', 'फकिरा', 'वैजयंता', 'चंदन', 'माकडीचा माळ', 'गुलाम', 'चिखलातील कमळ', 'रानबोका', 'आघात', 'डोळे मोडीत राधा चाले', 'रत्ना' इ. कादंबऱ्यात दलित जीवनचित्रण आले आहे.

यानंतर शंकर थोरात यांनी 'हातभट्टी'(१९७०), 'मी मुक्त! मी मुक्त !(१९७१), 'झोपडपट्टी' (१९७३), 'गावचा टिनोपल गुरुजी'(१९७३), 'मसालेदार गेस्ट हाऊस' (१९७४), 'पारधी' (१९८०), 'फुटपाथन नं.१ (१९८०), या कादंबऱ्यात जीवनचित्रण आढळते. खरातानंतर ना. रा. शेंडे यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांचे 'शृंगारलेले प्रेत'(१९३८), 'काजळी रात्र' (१९५६), 'तांबडादगड' (१९५८), 'विलासिनी' (१९७४), 'अंशुजा'(१९७४), 'गायत्री' (१९७८) या कादंबऱ्यातून दलित असून दलित जीवन भोगूनही कादंबऱ्यात दलित जीवन येत नाही.

यानंतर नामदेव व्हटकर 'अपराधी' (१९४४), व 'सोळा शिणगार' (१९६८), हे कादंबरी लेखन अल्पसे आहे. व्हटकरानंतर हि. गो. बनसोडे हे कादंबरीकार त्यांनी 'मुक्तीसंग्राम'(१९७३), 'आभाळाएवढी' (१९८१), या कादंबऱ्या. तर 'मुक्तीसंग्राम' मध्ये दलित मुक्तीलढा आला आहे.

दलित कादंबरी लेखनात प्रा. केशव मेश्रांमांची महत्त्वाची भूमिका आहे. 'हकीकत आणि जटायू' (१९७२), 'पोखरण' (१९७९), या महत्वपूर्ण कादंबऱ्या आहेत. 'हकीकतमध्ये दलित नायकाचे अनुभव चित्रित केले आहेत. तर 'जटायू' ही प्रतिकात्मक आहे.

नंतरच्या काळात ज. वि. पवार यांची 'बलिदान' (१९७०) हरिभाऊ पगारेंची 'युगप्रवर्तक'(१९७०), भीमसेन देठे यांची 'इस्कोट'(१९८०), भि. शि. शिंदे यांची 'अमृतनाक' (१९८०), सुधाकर गायकवाड यांची 'शुद्र'(१९८०), या दलित जीवन विचार मांडणाऱ्या कादंबऱ्या तर बांगूलांची 'सूड' लहान असणारी पण गुणांनी वेगळी कादंबरी आहे. नामदेव ढसाळांची 'हाडकी हाडवळा' (१९८१), अशोक व्हटकरांची 'मेलेल पाणी' (१९८२) यातून दलित जीवनाचे वास्तव स्वरुप येते.

शरण कुमार लिंबोळे यांच्या 'दंगल' व 'परपुरुंष' या कादंबऱ्या. तर कचरु भालेराव याची 'स्मशानभूमी' बाबूराव गायकवाड यांची 'आग', उत्तम बंडू तुपे यांची 'झुलवा' इ. दलित कादंबऱ्या महत्त्वाच्या आहेत.

**ग्रामीण कादंबरी :—**

'पिराजी पाटील' (१९०३) ही रा. वि. टिकेकरांची मराठीतील पहिली कादंबरी मानली जाते. यापासून मराठी ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीस प्रारंभ झाला. म. फुलेंच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' याला तर विस्तृत निबंध मानले जाते. यानंतर कृष्णराव भालेकरांच्या 'बळीबा पाटील' ही कादंबरी सत्यधर्मास अनुसरुन केलेले विवेचन संवादरुपी आहे. ही 'दीनबंधू' मधून प्रसिध्द झाली. हीची व्याप्ती कादंबरीएवढी नसल्याने रायकरांनी हिला कादंबरी म्हणता येणार नाही असे सांगितले म्हणून मराठीतील पहिल्या कादंबरीचा मान टिकेकरांच्या 'पिराजी पाटीलला मिळाला टिकेकरांनी त्याअगोदर 'वाईकर भटजी' (१८१८), लिहिली पण 'पिराजी पाटील' ला जास्त लोकप्रियता मिळाली.

ना. वि. कुलकर्णी यांना 'खेडूत सृष्टीचे कादंबरीकार' संबोधले जाते. ग्रामीण, कष्टकरी लोकांचे जीवनचित्रण करण्याचा त्यांनी ध्यास घेतला. 'मजूर' (१९२५), 'शिपाई' (१९२५), 'माणिक (१९३१), 'न्याय'(१९२६) 'संसारात कष्टी वडील' (१९३०) इ. त्यांच्या कांदबऱ्या.

'खेडयाकडे चला' गांधीचा मंत्र घेऊन वा. म. जोशी, वि. स. खांडेकर, मामा वरेरकर गांधीवादी तत्वज्ञानाने प्रेरित होऊन ग्रामीण साहित्यांकडे वळले पण ग्रामीण जीवनाचे त्यांनी वरवरचे चित्रण केले. त्यात साने गुरुजींची 'श्यामची आई'.

ग्रामीण कादंबरीकारात र. वा. दिघेंचे स्थान वेगळे आहे. त्यांनी ग्रामीण कादंबरीला निसर्गाजवळ पोचविले निसर्गाच्या विविध रुपातच ग्रामजीवन घडत असते आणि फुलत असते याचे प्रत्यकारी चित्रण दिघ्यांच्या कादंबऱ्यात आढळते. 'पाणकळा', 'सराई', 'आई आहे शेतात', 'पड रे पाण्या', 'कार्तिक', या महत्त्वाच्या ग्रामीण कादंबऱ्या.

याच काळात ग. रा. वाळींबे (रामतनय) 'मोहित्यांची मंजुळा' (१९३१), 'खरा उद्धार' (१९३६), 'साखर गोष्टी' (१९४४), 'प्रमिलाबेन' (१९४७), व 'गजाआड' या कादंबऱ्या लिहिल्या. वि. वा. हडपांनी आपल्या काही कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनांचे चित्रण केले. रा. शा. पाटील यांनी 'सीता' (१९३१), लिहून ग्रामीण भागाचा कायापालट कसा होईल या बद्दल मत मांडले. ना. हं. आपटे, दा. न. शिखरे यांनी ग्रामीण कादंबरीच्या विकासात भर घातली.

ग. ल. ठोकळांची 'गावगुंड' आणि दिघेंची 'पाणकळा' यात साम्य आढळते. १९५० च्या सुमारास विभावरी शिरुरकरांनी 'बळी' ही कादंबरी लिहून ग्रामीण वाङ्. मयाला खरा प्रारंभ केला. यावेळेसच मराठी कादंबरीत नवचैतन्य दिसून येऊ लागले. 'हिंदोळयावर'(१९३४), 'विरलेले स्वप्न' (१९३५), यातून स्त्रियांच्या वेदनेला वाचा फोडली. 'बळी' मध्ये गुन्हेगारीचे चित्रण येते.

१९४० ते ५० च्या आसपास श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकरांनी ग्रामीण कादंबऱ्या लक्षवेधक लिहिल्या. 'हददपार', 'एल्गार', 'गारंबीचा बापू', 'हत्या', यात कोकणातील निसर्ग येतो. प्रादेशिक कादंबरीकार म्हणून त्यांची प्रतिमा झाली. 'कलंदर', 'रथचक्र' यातून ग्रामीण जीवन चित्रित होते.

गों. नी. दांडेकर 'शितू' 'तुडवलेले घरकुल' (१९४८), 'पडघवली' (१९५५), 'पवनाकाठचा धोंडी' (१९५५), 'माचीवरली बुधा' (१९५८), 'जैत रे जैत', 'रानभूली' (१९७८), अशा निसर्गवर्णनाने भरलेल्या कादंबऱ्या. निसर्ग, ग्रामीण वातावरण व त्याच्या जोडीला इतिहासही आलेला आहे. व्यंकटेश माडगुळकर यांची 'पुढचे पाऊल' (१९५०), 'बनगरवाडी' (१९५५), 'वावटळ' (१९६४), 'कोवळे दिवस' (१९७९), 'करुणाष्ठक' (१९८२), अशा त्याच्या कादंबऱ्या. 'बनगरवाडी' तर मैलाचा दगड ठरली. अण्णाभाऊ साठेही स्वतःला ग्रामीण लेखक म्हणवून घेत असत. कृष्णा, वारणा नद्यांचा निसर्ग कादंबऱ्यांत येतो.

'धग' ही उद्धव शेळकेंची कादंबरी मराठी ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीत उल्लेखनीय आहे. त्याचप्रकारे रणजित देसाईची 'बारी', 'माझा गाव', 'समिधा' इ. कादंबऱ्यातून ग्रामीण वास्तवाचा आविष्कार त्यांनी घडविला. शंकर पाटीलांची 'टारेफुल' ही कांदबरी ग्रामीण मानसिकतेचा आविष्कार घडविते. हीची मांडणी रुढ संकेत बदलून केलेली आहे. तर हमीद दलवाईची 'इंधन'(१९६५) ही सामाजिक वास्तवाबद्दल जाण येण्यासाठी लिहिलेली विचारप्रेरक कादंबरी आहे.

जयवंत दळवी यांच्या 'सारे प्रवासी घडीचे' (१९६४) बालपणीच्या आठवणीवर आहे. तर 'महानंदा' मध्ये भावीणीच्या मुलीची परवड चित्रित केले आहे. 'धर्मानंद' यात उध्वस्त कुटुंबाची कहाणी रेखाटली आहे. चिं. त्र्यं.

खानोलकरांनी काव्ये, नाटयाबरोबरच 'रात्रकाळी घागरकाळी', 'अगोचर', 'कोंडूरा', अशा कादंबऱ्यातून ग्रामीण कोकणी अनुभवविश्व साकारले.

साठनंतरच्या ग्रामीण कादंबरीकारात वेगळी छाप पाडणारे रा. रं. बोराडे यांची 'पांचोळा'(१९७१) ही लक्षणीय कादंबरी आहे. मराठवाडयांतील ग्रामीण कादंबरीकारात त्यांना महत्वाचे स्थान मिळाले. कृषीजीवनावर यंत्रयुगाचा काय परिणाम झाला. हे अनुभवलेले सत्य 'गोतावळा' मध्ये आनंद यादवांनी सांगितले तर 'नटरंगी' मध्ये नाटयकलावंताची शोकांतिका मांडली. यानंतर ना.धो. महानोरांची 'गांधारी' चंद्रकुमार नलगेंची 'आगीनफुल', 'गस्त', 'देवाची साक्ष', इ. ग्रामीण कादंबऱ्या.

कथेबरोबरच कादंबरीमध्ये ठसा उमठविणारे लेखक महादेव मोरे, 'पाव्हणा', 'एकोणीसावी जात', 'पनोती', 'रैत', 'वस्ती', 'लाईन', 'झळा', इ. महत्वाच्या कादंबऱ्या स्वभाव, दु:ख दारिद्रयाचे जिवंत चित्रण त्यातून केले.

१९७५ नंतर 'कागुद' व 'सावली' या दोन आनंद पाटलांच्या लघुकादंबऱ्या होत. यातील जीवनानुभव अस्सल ग्रामीण आहे. पुरुषोत्तम बोरकरांची 'मेड इन इंडिया' ही कादंबरी वेगळया प्रकारची आहे. ग्रामीण कादंबरीकारात बाबाराव मुसळे नागनाथ कोत्तापल्ले वासुदेव मुलाटे, हे महत्वाचे लेखक आहेत. तर राजन गवस यांच्या 'चौडकं','भंडारभोग' या कादंबऱ्यातून जोगंतीण आणि जोगत्या यांचा दीनवाण्या जगण्यावर प्रकाश टाकला आहे.

अशाप्रकारे ग्रामीण दलित कादंबरीचा विकास पाहिला यानंतर बाबाराव मुसळेंचा परिचय करुन घेऊ.

## ३) बाबाराव मुसळे यांचे जीवनचरित्र :—

विदर्भातील वाशिम जिल्हयाला एक साहित्यिक परंपरा लाभलेली आहे. या जिल्हयात रहस्य कथाकार द. वि. सोमण, गूढ कथाकार दिवाकार नेमाडे, सुप्रसिध्द नाटयलेखक महेश एलकुंचवार, विनोदी लेखन करणारे अशोक मानकर, दलित साहित्यक नामदेव चं. कांबळे अशा साहित्यिकांबरोबर साहित्याच्या क्षेत्रातील लहान—मोठे भरपूर पुरस्कार मिळविणारे दलित—ग्रामीण साहित्याच्या सीमारेषेवर

लेखन करणारे लेखक बाबाराव मुसळे यांचे संपूर्ण नाव— बाबाराव गंगाराम मुसळे. त्यांचा जन्म १० जून १९४९ मध्ये त्यांच्या मूळ गावी ब्रम्हा येथे झाला. (ता. अनसिंग, जि. वाशिम) ब्रम्हा हे वाशिम पुसदरोडवर वाशिमपासून अठरा कि. मी. अंतरावर आहे. मुख्य रोडपासून दीड किलोमीटर आत आहे. आईचे नाव कलावतीबाई सध्या फक्त त्यांचे वडील हयात आहेत. बाबाराव मुसळे हे जातीने हिंदू मराठा. बाबाराव मुसळे यांना दोन भाऊ व तीन बहिणी, हया सर्व बहिणी त्यांच्यापेक्षा लहान आहेत. या तिन्ही बहिणी शेतकरी घरात दिलेल्या आहेत. मुसळेंचे थोरले बंधू प्रायमरी शिक्षक म्हणून आता सेवानिवृत्त झाले आहेत. लहान भाऊ नववा वर्ग शिकून सध्या शेती करतो. सर्व बहिणी सातवी पर्यंतच शिकलेल्या आहेत.

बाबाराव मुसळे यांचे आई—वडील निरक्षर होते. परंतु त्यांना आपल्या मुलांनी शिकावे अशी तळमळ होती. म्हणून घरी चाळीस एकर जमीन असूनही वडिलांनी बाबाराव मुसळे यांना व त्यांच्या भाऊ—बहिणींना कधी शेतात कामाला लावले नाही. १९७१—७२ च्या दुष्काळाने लहान भावाचा बळी घेतला आणि त्यावेळी त्यांना मध्येच शाळा सोडावी लागली. त्यावेळी मुसळेंना व त्यांच्या कुटुंबातल्या सर्वांना फार दु:ख झाले. आज बाबाराव मुसळे व त्यांचे मोठे बंधू यांना सरकारी नोकरी असल्याने त्यांची आर्थिक स्थिती, कौटुंबिक स्थिती चांगली आहे. मुले व्यवसाय — नोकऱ्या करीत आहेत. लहान भावाची आर्थिक स्थिती मात्र चांगली नाही. कारण तो शेतीच करतो. त्याच्या मुलाने काही तरी बनावे काहीतरी करुन दाखवावे म्हणून बाबाराव मुसळे यांनी त्याला आपल्याकडे शिकायला नेले, परंतू त्याचा परिणाम शून्य झाला. तो ही आपल्या वडिलांसारखा शेती करतो.

विदर्भात कोरडवाहू शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण पहाता मुसळेंना व त्याच्या मोठया भावाला, शेतीत काम करणाऱ्या भावाविषयी सदैव काळजी वाटते. बाबाराव मुसळेंना वाटते की, जर आज तो बंधू शिकला असता तर नोकरीला लागला असता त्याच्यावर शेतीकरायची वेळ आली नसती. मुसळेंचे प्राथमिक शिक्षण गावातल्याच शाळेत झाले. मॅट्रीकला अनसिंग येथील प. दि. जैन

विद्यालयात शिकायला गेले. मॅट्रीकनंतर पुढील शिक्षणासाठी परभणीच्या श्री. शिवाजी महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला कारण, त्यांचे मोठे बंधू श्री. साहेबराव मुसळे हे परभणी जिल्हयात प्रायमरी शिक्षक म्हणून कार्यरत होते. बाबाराव मुसळेंच्या शिक्षणाला त्यांचा फार मोठा हातभार लागला. काही वेळेला साहेबराव मुसळे यांनी प्रसंगी मोठया अडचणींचा सामना केला व बाबाराव मुसळे यांचे शिक्षण पूर्ण केले. १९७३ ला मुसळे बी. एस्सी (जीवशास्त्र) झाले. त्याचवेळी नुकताच ९वी, १०वी चा अभ्यासक्र बदलेला होता. ९वी, १०वीच्या विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान हे विषय सक्तीचे केले होते. त्यापूर्वी ९ व्या वर्गातील मुलांना आर्ट्स सायन्स, कॉमर्स यांपैकी एखाद्या विषयाची निवड करता येत होती. नवीन अभ्यासक्रमानुसार सर्व विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान विषयाची सक्ती झाल्यामुळे बी. एस्सी (जीवशास्त्र) पद्वीधरांना एकाएकी मागणी आली. त्यामुळे श्री. पारेश्वर विद्यालय, पार्डी, टकमोर, ता.जि. वाशिम येथे दि. १९ जुलै १९७३ रोजी बाबाराव मुसळे विज्ञान शिक्षक म्हणून रुजू झाले.

बाबाराव मुसळे यांची पहिली कथा १९७० च्या दरम्यान नाशिकच्या "दै. आपण" मध्ये प्रकाशित झाली. नंतर त्यांनी १९७०–९० कथाच लिहिलेल्या दिसतात या काळात अल्प प्रमाणात कविताही त्यांच्या प्रकाशित झाल्या. मुसळे हे महत्वाचे म्हणजे लिहिते कसे झाले? याविषयी ते १९६७ ला मॅट्रीक पास झाल्यानंतर पुढील महाविद्यालयीन शिक्षणासाठी परभणीच्या शिवाजी कॉलेज मध्ये त्यांनी प्रवेश घेतला. तेव्हा त्यांचे वडीलबंधू चुडावा (ता.वासमत, जि.परभणी) येथील जि. परिषदेच्या हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या शाळेची लायब्ररी समृध्द होती. वडीलबंधू त्या लायब्ररीमधून बाबाराव मुसळेंना पुस्तके आणून देत. ती पुस्तके झपाटल्यासारखी वाचत. फडके–खांडेकर, शिवाजी सावंत, रणजित देसाई ना. स. इनामदार इ. लेखकांची पुस्तके बाबाराव मुसळेंच्या वाचनात त्याकाळी आली. वाचनाचा अवाका मोठा होता. हातात घेतलेले पुस्तक एका बैठकीत पूर्ण केल्याशिवाय त्यांना चैन पडत नव्हता. नंतर वाचनापेक्षा चिंतनात वेळ जावू लागला. कथा–कादंबरीला एखादा प्रसंग वाचला की त्यामधील उणिवा जाणवत. हा प्रसंग असा मांडला असता तर ..... त्यातूनच त्या प्रसंगाला समांतर

कथा सुरु होई. एकदा अशाच चिंतनातून मुसळेकडून एक कथा निर्माण झाली व ती साप्ताहिकातून छापून ही आली. अशा प्रकारे १९७० चं दशक बाबाराव मुसळे यांनी नुसतेच कथालेखन केले. हाच बाबाराव मुसळे यांचा लेखनातील उमेदवारीचा काळ होता. या कथालेखनात नाविन्य नसायचे. १९८० च्या दशकात सुरुवातीला डॉ. आनंद यादव यांनी मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, यांच्या सहकार्याने 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा' हा उपक्रम जाहिर केला होता. त्यासाठी मुसळेंनीही आपल्या तीन कथा पाठविल्या मात्र त्या साभार परत आल्या व त्यासोबत ग्रामीण कथा गाभीर्याने कशी लिहावी याबद्दल सूचना देणारे डॉ. यादव यांचे पत्र आले. असाच यादवांशी मुसळे संवाद साधू लागले. आणि मुसळेंना अस्सल ग्रामीण कथालेखनाचा सूर गवसला. अनुष्टुभच्या रेऊ कथास्पर्धेतून लागोपाठ चारवेळा बक्षीसे मिळाली. महाराष्ट्रात सर्वत्र प्रसिध्दी मिळाली. अनुष्टुभचा नियमित लेखक बाबाराव मुसळे झाले. 'अस्मितादर्श' अक्षरवैदर्भी सारख्या मान्यवर मासिकांच्या दिवाळी अंकांचे ते मानकरी झाले. यावेळेसच मुसळेंच्या कथेला साहित्यमूल्य प्राप्त झाले.

'अस्मितादर्श' व डॉ. गंगाधर पानतावणे यांच्यामुळे सामाजिक विषमतेवर आधारित उत्कृष्ट कथा लिहिण्याचे भान प्राप्त झाले. 'अस्मितादर्श' मधून कथा, कविता प्रकाशित झाल्या. की वाचकांची पत्रे येत. त्यामध्ये सुरुवातीचा मायना 'आयुष्यमान' असा असे म्हणजे दलित वाचक लेखक मुसळेंना आपल्यापैकीच एक समजत असत. पुढे दीर्घकाळ याबाबत कोणालाही कळलेही नाही. यात मुसळेंना काही लपवायंच नव्हतं. जे घडत होतं ते मुसळेंजवळ असणाऱ्या दलितांच्या सहानुभूतीमुळेच. त्यामुळे 'वारुळ' सारखी अत्यंत प्रक्षोभक विषयावर असणारी कादंबरी त्यांनी अत्यंत तटस्थता बाळगून लिहिलेली कादंबरी आहे. त्यात कुठल्याही जाती पातीबद्दल एकांगीपणा आला नाही.

१९८३ च्या दरम्यान मेहता पब्लिशिंग हाऊसने डॉ. यादव आणि डॉ. द. दि. पुंडे यांच्या सहकार्याने 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी' या स्पर्धात्मक उपक्रमाचे आयोजन केलेले होते. मोठया जिद्दीने आत्मविश्वासाने 'हाल्या हाल्या दुधू दे' या कादंबरीचे हस्तलिखित मुसळेंनी पाठविले आणि त्याला प्रथम क्रमांक

डॉ. यादव, डॉ. पुंडे यांनी दिला. पुढे कादंबरी प्रकाशित झाली आणि मुसळे यांना महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने लोकमान्यता मिळाली. नंतर आलेल्या त्यांच्या 'पखाल', 'वारुळ' या कादंबऱ्यांना शासनाने पुरस्कारही दिले. व बाबाराव मुसळे यांना लोकमान्यता आणि शासनमान्यता मिळाली.

## ४) बाबाराव मुसळे यांच्यावर झालेले जीवन संस्कार :–

बाबाराव मुसळे यांचा जन्म अशिक्षित शेतकरी कुटुंबात १० जून १९४९ रोजी झाला. त्याच्या घरी ४० एकर जमीन होती. तशी त्यांची आर्थिक परिस्थिती बरी आहे. मध्यम वर्गियांसारखे त्यांच्या जीवनावर जाणीवपूर्वक संस्कार झाले नाहीत. त्यांचे वडीलबंधू श्री. साहेबराव मुसळे हे परभणी जिल्हयात प्रायमरी शिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांनी मुसळे यांच्या शिक्षणाला महत्वाचा हातभार लावला. बाबाराव मुसळे परभणीच्या शिवाजी कॉलेजमध्ये शिकत असताना वडील बंधू चुडावा, (ता. वासमत, जि. परभणी) येथील जि. प. हायस्कूलात शिक्षक होते. त्या शाळेतील लायब्ररी समृध्द होती. साहेबराव पुस्तके आणून देत बाबाराव मुसळे ते वाचून काढीत. फडके–खांडेकर, शिवाजी सावंत, रणजित देसाई यांसारखे महत्वाचे लेखक वाचून झाले. वाचतांना सतत त्यांचे चिंतन चालू असे. प्रसंग, रचना इ. विषयक मनात शंका निर्माण होत असत. अशा अवस्थेतच कथा लेखनाची स्फूर्ती मिळाली. कथेबरोबर कवितांही लिहून प्रसिध्द झाल्या. बी. एस्सी. बी. एड. झाल्यानंतर मुसळे यांनी मराठी या विषयांतून एम. ए. पूर्ण केले. मराठी या विषयाची विशेष अशी आवड त्यांना निर्माण झालेलीच होती. साहित्याच्या वाचनातून त्यांचे जीवन अधिकाधिक संस्कारमय बनत गेले. शिक्षण घेत असताना जीवनात भेटलेल्या चांगल्या व्यक्ती, त्यांचा मुसळे यांना मिळालेला सहवास यामुळे त्यांच्या जीवनावर संस्कार झाले. परिवर्तनवादी चळवळींशी त्यांचा संपर्क येऊ लागल्याने त्यांना अनेक व्यक्ती भेटल्या. त्यांचा सहवास लाभल्याने त्यातूनच त्यांच्या जीवनाची, साहित्याची जडणघडण होत गेली.

भौगोलिक परिस्थिती वडगांव—अनसिंग वाशिम अकोला, औरंगाबाद इ. ठिकाणी असणारी सामाजिक राजकिय, आर्थिक स्थितीगतीचा त्यांच्या जीवनावर कसा परिणाम झाला याचा आलेख म्हणजे बाबाराव मुसळे यांचे लेखन होय.

## ५) बाबाराव मुसळेंना मिळालेले विविध पुरस्कार :—

लेखकाच्या साहित्यकृतींना मिळालेले पुरस्कार हे साहित्यकृतीचे श्रेष्ठत्त्व स्पष्ट करीत असतात. त्याचबरोबर लेखकांचे मोठेपणही त्यातून सिध्द होत असते. बाबाराव मुसळे यांच्या सामाजिक आणि वाङ्.मयीन कर्तृत्वाचा विचार करुन त्यांना विविध छोटया—मोठया पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

| अ.क्र. | पुरस्कार | पुरस्काराचे वितरण | वर्ष |
|---|---|---|---|
| १) | 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी (डॉ. आनंद यादव, डॉ. द. दि. पुंडे यांच्या सहकार्याने) 'हाल्या हाल्या दूध दे' कादंबरीला | मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे. — महाराष्ट्र शासन | १९९५—९६ |
| २) | उत्कृष्ट वाङ्.मय निर्मिती पुरस्कार (पखाल) | — महाराष्ट्र शासन | |
| ३) | उत्कृष्ट वाङ्.मय निर्मिती पुरस्कार (वारुळ) | — महाराष्ट्र शासन | २००४—२००५ |
| ४) | कै. पु. य. देशपांडे स्मृती पुरस्कार (वारुळ) | — विदर्भ साहित्य मंच, नागपूर | |
| ५) | जनसारस्वत वाचनालय पुरस्कार (वारुळ) | — जनसाहित्य परिषद अमरावती | |
| ६) | 'तुका म्हणे पुरस्कार' (वारुळ) | — मराठी अनुवाद परिषद बुलढाणा | |
| ७) | नागपूर साहित्य पुरस्कार (वारुळ) | — पदमगंधा प्रतिष्ठान, नागपूर | |
| ८) | बाबा पद्मनजी साहित्य पुरस्कार (वारुळ) | कै. यशवंत दाते स्मृती प्रतिष्ठान, वर्धा | |
| ९) | 'शब्दपंढरी' साहित्य पुरस्कार (वारुळ) | — शब्दपंढरी प्रतिष्ठान, लातूर | |

| | | | |
|---|---|---|---|
| १०) | कै. भि. ग. राहेमारे पुरस्कार (मोहरलेला चंद्र) | — कोपरगांव | १९९२ |
| ११) | लोकमत—कामगार साहित्य संमेलन सोलापूरचा पुरस्कार (झिंगु लिखु लिखु) | — लोकमत कामगार साहित्य संमेलन, सोलापूर | १९९४ |

अन्य पुरस्कार :— राज्य पुरस्कार आदर्श शिक्षक (२००२)

इतर :— अध्यक्ष अंकुर साहित्य संमेलन मालेगाव (१९८५)

:— अध्यक्ष तिसरे ग्रामीण साहित्य संमेलन, शेवाळ पिंप्री, जि. यवतमाळ (१९८८)

:— सदस्य मराठी अभ्यास मंडळ, अमरावती विद्यापीठ (१९८७—९०)

:— सदस्य, जिल्हा साक्षरता सर्वसाधारण समिती जि. वाशिम (२००६)

## ६) बाबाराव मुसळे यांचे कथालेखन :—

बाबाराव मुसळे यांनी लेखनाला सुरुवात कवितेपासून केली. त्यांची 'प्रश्न' नावाची कविता डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी संपादीत केलेल्या 'दलित प्रेम कविता' या संग्रहात समाविष्ठ आहे. तर या कवितेचे भगवान ठग संपादित 'Dalit Poetry Today' च्या एका Volume मध्ये इंग्रजी भाषांतर झाले व तिथून पुढे लेखक कथालेखनाकडे वळले. कथा वाङ्मय प्रकारातच त्यांनी आपल्या सभोवतालच्या शिक्षित, अर्धशिक्षित ग्रामीण लोकांच्या सुख—दुखांना पकडले. १९७१ साली त्यांची 'रक्त' नावाची कथा प्रकाशित झाली. ती 'अनुष्टुभ' मधून. त्यानंतर त्यांनी एक दशक फक्त कथालेखनच केले. स्वत:च्या लेखनात किती कस आहे. याचा कधी त्यांनी विचार केला नाही. याच काळात ' अनुष्टुभ ' मासिकाचा 'सत्यकथे' सारखा दबदबा होता. अनुष्टुभच्या 'रेऊ कथा स्पर्धेत' १९७९ साली 'काटा' नावाची कथा पाठवून बाबाराव मुसळेंनी भाग घेतला. त्यामध्ये व त्यानंतरच्या सलग तीन स्पर्धेतून त्यांना चार बक्षिसे प्राप्त झाली. पाचव्या वेळेस मात्र यानंतर स्पर्धेत भाग घेऊ नये. अशी मुसळेंना अनुष्टुभच्या संपादकांनी सूचना केली. अनुष्टुभच्या कथा स्पर्धांनी त्यांना कथालेखनासाठी आत्मविश्वास आला. कथालेखनासाठी त्यांना आत्मभान आले. त्यांचा महाराष्ट्रात चोखंदळ वाचक वर्ग निर्माण झाला. 'अनुष्टुभ',

'अस्मितादर्श', 'अक्षरवैदर्भी', 'दोंडाईचे लोकमानस', जनसाहित्य संमेलन विशेषांक 'बळीराजा', 'अक्षरछाया', 'ज्वाला', इ. मासिके व नियतकालीकातून दीडशे पेक्षा जास्त कथा प्रसिध्द झाल्या. कोल्हापूरपासून भंडाऱ्यापर्यंत विविध व्यासपीठांवरुन त्यांनी कथाकथन केलेले आहे. ग्रामीण साहित्यचळवळ व जनसाहित्य चळवळ यांच्याशी मुसळेंचा संबंध आल्यामुळे त्यांची कथा प्रौढ, गंभीर झाली. वास्तवजीवनदर्शन घडविण्याने ते अधिक अंतर्मुख झाले. कथेतील वेगळेपणामुळे भोपाळमध्ये भारत भवनने आयोजित केलेल्या 'भारतीय भाषिक लेखक शिबिरात' मराठीचे सदस्य मुसळेंना मिळाले होते. अमरावती विद्यापीठाच्या बी. ए. भाग २ च्या मराठींच्या पाठयपुस्तकात 'दावणीचा बैल' व 'अल्पभूधारक' कथांचा समावेश केलेला आहे. त्यांचे दोन कथा संग्रह प्रसिध्द झाले त्यांचा सविस्तर विचार पुढील प्रमाणे करु.

१) **<u>'मोहरलेला चंद्र'</u>** हा त्यांचा पहिला कथासंग्रह (१९९२) मध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केला. या कथासंग्रहात एकूण १५ कथांचा समावेश आहे. सुरुवातीच्या काळातील त्यांची कथा प्राथमिक वाटत असली तरी मानवी वाटत असली तरी मानवी स्वभावाच्या विविध स्वभाव वैशिष्टयांवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. याबाबत या कथासंग्रहातील कथांच्या अंतरंगातील वेगळेपण सविस्तर पाहू.

'इंधं' या कथेत अन्नपूर्णाचा संत्या इंचा असतो म्हणजे पाळी विना त्याच्या आईला तो झालेला होता. अशा इंध्या माणसाला वीज धार्जिण असते अशा भांगलायला गेलेल्या बायकांची समजूत असते. त्यामुळे सर्व अन्नपूर्णाचा व संत्याचा द्वेष करतात.

'उत' या कथेत पतिप्रेमासाठी आसुसलेल्या तिर्विनासारख्या एका गरीब स्त्रीची शोकांतिका येते. शेवटपर्यंत तिला पतिप्रेम मिळत नाही. उलट तिच्या मनाची घुसमटच अधिक झालेली दिसून येते.

'भुजंग' दत्ता पाटील व महादेव पाटील हे दोघेभाऊ, त्यांची जमीन धरणात गेली होती. त्यांचे ९० हजार रुपये दत्ता पाटलांकडे मिळालेले होते ते महादेवला

द्यायला लागतील म्हणून दत्ता पाटील मॅडपणाचे सोंग घेतात. भूजंग त्यांचे सोंग उघडे पाडतो. व पाटलांची मतलबाची छापड उडवितो.

'घमडया' कथेतला प्रभू मांग परिवर्तनवादी चळवळीच्या बरोबर विरोधी वागतो. मांग मातंग झाले. गावकीची कामे त्यांनी सोडून दिली. प्रभू मांग मात्र 'मांग म्हणून मी जन्माले आलो अन मांग म्हणूनच मरीन' असे सांगतो. आंबेडकरांच्या विचारांच्या विरोधी विचार असलेला दिसतो. प्रभूची बायको सरी ही त्याच्यासारखीच वागते.

'सरकारी हिशेब' एक सरकारी अधिकारी येऊन अजाबराव पाटलांच्यात सालाने असणाऱ्या गणाची चौकशी करतो. गणा खरी माहिती सांगतो. चौकशी होते पाटलांना त्याचा त्रास होतो. परिणामी पाटील गणाला त्रास देतात. कामावरुन काढून टाकतात. गडी म्हणून गणाला कोणीच कामावर ठेवीत नाही. असा कथाभाग यात येतो.

'निंदणं' कौतिक गरोदर असते. इंद्री तिला भांगलायला बोलावते. भांगलत असताना कौतिकच्या पोटात दुखायला लागते सर्व बायका भांगलण सोडून तिला घेऊन घरी येतात. कौतिक घरी आल्यानंतर तिच्या पोटात दुखायचे थांबते.

'देवाचा न्याय' माळकऱ्यांच्या गावात गावजावई हरि चहाचे हॉटेल घालतो. त्यावर तो न थांबता मटका, जुगार, दारु अडडा सुरु करतो. पंचायत समितीचे तिकीट मिळवितो निवडून येतो. मंत्र्यांसोबत राहातो हरामचा अमाप पैसा गोळा करतो. ते गाव तो खराब करतो दिवाळीला लक्ष्मीपूजना दिवशी त्याच्या घराला आग लागते. सगळी संपत्ती जळते. तर हरि ट्रक अपघातात मरतो.

'हार—जित' या कथेत/स्त्री शिकली परंतु तिला तिच्या तोलामोलाचा नवरा मिळत नाही. कैलासाची पहिली बायको मेल्यानंतर सोमित्राचे वडील अनेक मुले पहिल्यानंतर कैलाशशी सोमित्राचे लग्न लावतो या दोघात हार जित लागते. कैलास कुडता पायजमा घालतो, तर सोमित्रा नऊवारी लुगडे नेसून मारुतीची पूजा करते.

'चौघडा' पांडूची सनई वाजवणे बन्सी शेठला आवडते. शेठ पांडूला इनाम देतो. कांही वर्षानी पांडूची सनई ऐकण्याची ईच्छा शेठजीला होते. कालांतराने सनई

चौघडयाचे जोड बंद पडलेले असतात. सनई वाजविण्यासाठी लोक मिळत नाहीत त्याचे पांडूला वाईट वाटते व तो आजारी पडतो.

'गुलाल' ही कथा हिन्दू—मुस्लीम यांच्या नातेसंबंधावर आधारित आहे. ही कथा मानवतावादी आहे. हिन्दू स्त्रीसाठी सय्यदला मुस्लीम बांधव मारतात असा कथाभाग या कथेत आला आहे.

'अल्पभूधारक' या कथेत स्त्रीच्या दु:खाला कारणीभूत असणारी अल्प जमीन व अल्पभूधारकांना मिळणाऱ्या सुविधा कशा कारणीभूत ठरतात. त्यांचे चित्रण येते. चिंतामण गावात पाहुणा असतो त्याच्या नावावर मिळणाऱ्या सुविधा पाटील घेतो व त्याचा राग चिंतामणची मुलगी नंदा हिच्या सासऱ्याला येतो व नंदाचा छळ सुरु करतात. तिला मारतात.

'पऊळीचे झाड' माणसापेक्षा काम गोंड असणाऱ्या विलास व त्यांच्या कुटुंबातल्या लोकांवर आधारित ही कथा आहे. रंजनाच्या अंगावर भिंत पडते. तरी विलास शेतात बांधच घालतो स्त्रीकडे, तिच्या दु:खाकडे कसे दुर्लक्ष होते याचे चित्रण या कथेत येते.

'कावळे' कारखान्यात नोकरीसाठी बारकूला १० हजार रुपये हवे असतात. सर्व पाहुण्यांच्याकडे पैसे मागतो. पैसे मिळत नाहीत. वडिलांना न सांगता तो चंपत जाधवला जमिन विकतो. त्याच्या वडिलांना नंतर समजत ते आडकाठी करतात बारकू नोकरीचा नाद सोडून देतो व वडिलांना बघत नाही. एका म्हाताऱ्याची वाताहात या कथेत सांगितली आहे.

'पांद' बायजाची मुलगी निर्मला हिला सासरला जाच असतो. तर बायजाला पंचफुला व घरगडी वाघजी यांचा जाच असतो. निर्मलला होणारा त्रास ती बायजाला सांगते. निर्मलचा नवरा मरतो. ती बायजाकडे रहायला येणार असते, पण पंचेफुला व वाघजी यांचा त्रास निर्मलला होईल म्हणून बायजाला दु:ख होते. दु:ख, दैन्य, दैवाच्या जाळयात सापडलेल्या स्त्रीची कथा 'पांद' या कथेत येते.

'मोहरलेला चंद्र' ही कथा या कथा संग्रहातील प्रातिनिधिक कथा आहे. 'पायरु' हा पाटलाच्या अर्ध्या मालमत्तेचा वारस आहे. त्याच्या बापाने मांगाच्या मुलीबरोबर लग्न केलेले असते. पायरु तिच्या पोटात असताना तिला महारोग होतो.

पायरुच्या जन्मानंतर ती विहिरीत जीव देते. पायरुचा बाप सदाशिव याला टी.बी. होतो. पायरुला पाटलाच्या वाडयात गुरे राखण्यासाठी ठेवले जाते. संभा पाटलांच्या वाडयातील खोलीत पायरु राहात असतो. कारण संभा पाटीलच्या सारखी पायरुलाही टी.बी होऊन मरावा, पाटलांचा वारस कमी व्हावा, अशी त्या वाडयातल्या लोकांची इच्छा असते. शाळेत असताना मुले त्याला मिसळून घेत नाहीत. गुरात त्याची जेवताना भाकरी घेत नाहीत. त्याला वगळण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. या वाईट प्रसंगांना कंटाळून तो जिथे आपल्याला कोणी ओळखत नाही. अशा गावी जातो.

**सारांश :—**

'मोहरलेला चंद्र' कथासंग्रहात वऱ्हाडी मिश्रित बोलीभाषा वापरुन परिणमकारक संवाद आणि प्रसंग चित्रित केले आहेत. सासरी स्त्रियांचा होणारा छळ, स्त्रियांना सहन करावी लागणारी अपमानित वागणूक त्यांच्याकडे केले जाणारे दुर्लक्ष, मानवी स्वभाव वैशिष्टये या कथा संग्रहातल्या प्रत्येक कथेत पात्रापात्रातून प्रत्येयास येतात.

२) <u>झिंगु लिखु लिखु :—</u>

हा बाबाराव मुसळेंचा दुसरा कथासंग्रह १९९४ मध्ये मेहता प्रकाशनाने प्रकाशित केला. या संग्रहात एकूण १० कथा आहेत. यामधील कथा थोडीशी प्रगल्भ झालेली दिसून येते. ग्रामीण वऱ्हाडी बोली भाषा, व्यक्ति विशेष, स्त्रीजीवन व त्यांच्या जीवनातील चढउतार यात प्रकर्षाने जाणवतात. या कथासंग्रहातील कथांचा परामर्श सविस्तर पुढीलप्रमाणे:—

'<u>दावणीचा बैल</u>' या कथेत शेतकऱ्यांची संसाराचा गाडा रेटताना होणारी दयनीय अवस्था सांगितलेली आहे. बी—बीयाणे आणण्यासाठी रामकिसन आपल्या लग्न झालेल्या मुलीच्या कानातील दागिना गहाण ठेवतो. मुलीला न्यायला तिचा नवरा येतो. त्यावेळी तिला रामकिसन पाठवित नाही. मुलीचा दागिना सोडवून आणण्यासाठी रामकिसन बायकोला न सांगता बैल विकतो. अशा प्रकारे स्त्री जीवन आणि शेतकरी जीवनाचा पैलू या कथेतून वाचकांच्या समोर येतो.

'तंबाखू' जनाई म्हातारी गावात बायकां—बायकांत तंबाखू खाण्याचा निमित्ताने येऊन भांडणे लावते. हीच जनाबाई, राधाबाई व तिची सून तिर्विना या दोघींमध्ये भांडण लावते. ग्रामीण भागातील असणाऱ्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा त्यांच्या स्वभाव वैशिष्टयानुसार या कथेत येतात.

'रुखवत' य कथेत देवकी व तिची कजाग सासू यांच्या स्वभावाचे चित्रण येते. देवकीच्या लग्नात रुखवताला चांगली साडी नेसवली नाही. म्हणून देवकीची सासू तिला छळते. नंतर देवकीचा नवरा त्यांच्या आईचा खून करतो. असा कथाभोग या कथेत येतो.

'बांगडया' ग्रामीण भागात परिस्थिती चांगली असो किंवा नसो आपल्या मुलांची हौस पुरविली जाते. सखू या एकुलत्या एका मुलीची बांगडया भरण्याची हौस पार्वती पुरविते, त्यासाठी ती घरातील ज्वारी देते.

'कॅन्सर' अंजूबायच्या सुभद्राची सासू अजागळ होती. सुभद्राचा नवरा तिला कॅन्सर झाला म्हणून सुभद्रावर उपचार करण्यासाठी सहा हजार रुपये सुभद्राच्या आईकडून घेतो. अंजूबाया मुलीसाठी शेतावर सावकारकडून पैसे घेऊन देते डॉक्टर सुभ्रदाला कॅन्सर नाही म्हणून सांगतात. अंजूबायला जावयाला दिलेले पैसे मागता येत नाहीत. या कथेत एका स्त्रीची मुलीसाठी झालेली आगतिकता स्पष्ट होते.

'खेळवण' काम करुन घेऊन सुरेखची खेळवण कजाग सासू सुरेखाला जेवण—पाणी देत नाही. आजारी असता नाही तिला औषधपाणी करीत नाही. सुरेखाचा नवरा या दोघींच्या जीवावर कॉलेजला जातो. उनाडक्या, चोऱ्या, व्यसन करीत फिरतो. घरातील वस्तू नेऊन विकतो. तरीपण सुरेखाची सासू त्याला पाठीशी घालते. विवाहित सासूरवाशीन स्त्रीचे दु:ख या कथेत प्रभावीपणे प्रकट झाले आहे.

'पखाल' या कथेचे सविस्तर रुप म्हणजे 'पखाल' कादंबरी, याच कथेचे आशयसूत्र विस्ताराने 'पखाल' कादंबरील पुंजाबा पखालीने गावाला बलुत्यावर पाणी घालतो. गावात हापस्या, नळयोजना आल्याने पुंजाबोचा पखालीचा धंदा बसतो. त्याला समजावण्याचा प्रत्येकजन प्रयत्न करतो. परंतु त्याचा वाईट परिणाम पुंजाबा वर होतो. तो वेडा होतो.

'पुतळया' या कथेतुन मानवी स्वभावाचे विशेष चित्रित केलेले आहेत. म्हातारीचा शेवटचा श्वास चालू असताना तिचा मुलगा मांधव तिच्या पुतुळया काढून घेतो. कारण म्हातारीची ईच्छा त्या पुतळया मुलीला चंद्रभागाला देण्याची असते. शेवटी जानकीची साडी म्हातारीला नेसवण्यासाठी आणायला जानकी जाते. तर त्यात त्या पुतुळया सापडतात माणूस मरत असले तरी लोकांची वागण्याची वृत्ती कशी असते त्याचे चित्रण यात येते.

'चंपी' जगन्नाथला कुत्री पाळण्याचा शौक होता. त्याचे वडिल विश्राम पाटील आणि यशवंत पाटील यांच्यात वैमनस्य होते. भुऱ्या व चंपी यांना एकमेकांचा लळा लागलेला होता. त्यामुळे चंपीजवळ भुऱ्या येऊ नये यासाठी जगन्नाथ भुऱ्याला मारतो. परंतु जगन्नाथच त्यात मरतो. चंपीची अवस्था मालकाविना वाईट होते. पुराच्या पाण्यांत पिलांसोबत ती वाहून जाते. मानवीजीवन आणि प्राणीजीवन यांची तुलना या कथेत केलेली आहे.

'आकडा' या कथेचा नायक केरबा महारोग झाल्याचे घरसोडून जातो. आपल्या नवऱ्याला शोधण्यासाठी बायजा, गिरजा विळयांना धार लावून पैसा जमा करतात. अंगावर झालेले कर्ज फेडण्यासाठी मटक्याचा आकडा गिरजा लावते. आलेल्या परिस्थितील तोंड देण्यासाठी सज्ज असणाऱ्या स्त्रीचे जीवन या कथेत पहायला मिळते.

'आपलं गाव भलं' खेडयातही एक म्हातारी शहरात मुलाकडे जाते. खेडयातल्या आणि शहरातल्या वातावरणातला फरक म्हातारीला आवडत नाही. शहरात म्हातारीचा निरस झाल्याने आठ दिवसात खेडयात परत येते. ग्रामीण माणूस शहरात गेल्यानंतर त्याची होणारी अवस्था या कथेतून कळते.

'बनाव' दारुडा रघू बायकोला सीताला पिऊन नाहाक त्रास देतो. पाटलीण रघूला वठणीवर आणण्यासाठी सीताला दारु पिण्याचे नाटक करायला लावते. त्यामुळे रघू वठणीवर येतो. सीताचा त्रास कमी होतो. एका स्त्रीचा त्रास कमी होण्यासाठी दुसरी स्त्री कसा बनाव करते. व स्त्रीच स्त्रीचे दु:ख कसे जाणून घेते. याचा प्रत्यय या कथेतून येतो.

'झिंगु लिखु लिखु' ही या कथासंग्रहाची प्रतिनिधिक कथा आहे. हा कथासंग्रहच मुळी त्याच्या नावावरुन व या कथेच्या आशयावरुन स्त्रीयांच्या सुख दु:खाचा आलेख मांडतो असे दिसते. सासूरवाशीण मुलीला होणारा जाच या कथेत सांगितला आहे.

"झिंगु लुखु लुखु, तुझ्या कपाळाले कुखु
तुहं तोंड काहून लाल?
माझं लगन झालं आज"

या विदर्भातल्या लोकगीताचा आशय अत्यंत चांगला आहे. परंतु वास्तवात मुलींचे जीवन सासरच्या जाचांनी भरलेले असते. या गीतातल्या सारखे सुख—समृध्दींने भरलेले जीवन मुलींना लाभत नाही. या कथेची नायिका मीराच्या नशिबी सासू व नवरा यांचा जाच कायम येतो. दिवसा राक्षसासारखा वागणारा नवरा रात्री मात्र तिच्या अंगाला गोचिडा सारखा चिकटतो. नशिबी दैन्य, आगातिकता आल्याने स्वत:चा आत्मविश्वास हरवून बसलेल्या स्त्रीचे दु:ख लेखकाने दमदारपणे मांडलेले आहे.

सारांश – 'झिंगु लिखु लिखु' या कथासंग्रहात स्त्रीयांच्या वाटयाला आलेले दु:ख, तिचा चार माणसात होणारी ओढाताण, तिला समाजात मिळणारा दुय्यम दर्जा, तिच्याकडे व तिच्या दु:खाकडे होणारे दुर्लक्ष यावर प्रकाश टाकलेला आहे. स्त्रीजीवना बरोबरच ग्रामीण भागातल्या लोकांची स्वभाव वैशिष्टये या कथांमधून वाचकांना समजतात.

## ७) बाबाराव मुसळे यांचे कादंबरीलेखन :—

कथांचे लेखन करीत असतानाच आपल्या हातून मोठे असे कांही लिहून होत नाही याची खंत बाबाराव मुसळे यांना वाटू लागली आणि त्यातून ते कादबंरीलेखनाकडे वळलेले दिसतात. आपले जीवनानुभव कथन करण्यासाठी कथेचा आकृतीबंध त्यांना अपूरा वाटू लागला व ते कादंबरीकडे आकर्षित झालेले दिसतात. १९८४—८५ च्या सुमारास त्यांनी कादंबरी लेखनास सुरुवात केली. त्यांनी एकूण चार कादंबऱ्या लिहिल्या आहेत. या साहित्य कृतींनी दलित व

ग्रामीण साहित्यात मोलाची भर घातलेली आहे. मुसळे दलित आणि ग्रामीण साहित्यांचा सीमारेषेवर कादंबरी लेखन करणारे १९८० नंतरचे विदर्भातले महत्त्वाचे लेखक मानले जातात. त्यांच्या प्रकाशित झालेल्या कादंबऱ्यांचा सविस्तर आढावा पुढीलप्रमाणे.

१) <u>'हाल्या हाल्या दुध दे'</u>

या कादंबरीने बाबाराव मुसळे यांनी कादंबरीलेखनाला सुरुवात केली ही कादंबरी 'मेहता पब्लिशिंग हाऊस' पुणे, यांनी १९८५ मध्ये प्रकाशित केली. ग्रामीण लेखक या नात्याने अवती भोवतीच्या फाटक्या—तुटक्यात संसार करणाऱ्या अडाणी माणसांची सुख—दुखे, राग, द्वेष, मोह, मत्सर इ. स्वतःच्या लेखनातून प्रामाणिकपणे माडण्यांचा प्रयत्न लेखकाने केला. डॉ. आनंद यादव आणि बाबा पाटील यांच्या संपादनाखाली 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा' ही योजना पार पडली व त्याचा कथासंग्रह आला. त्यापाठोपाठ 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी' ही योजना जाहीर झाली. या योजनेत चाळीसभर लेखकांनी आपल्या कादंबऱ्याची हस्तलिखिते पाठविले होती. ती वाचून स्वतंत्र टिपणे काढण्याचे काम दीड वर्षे डॉ. यादव आणि डॉ. द. दि पुंडे यांनी केले. त्यात या कादंबरीचा समावेश होता. डॉ. यादवांनी या कादंबरीत कांही बदल व दुरुस्त्या सुचविल्या. त्यानंतर डॉ. यादव व डॉ. पुंडे यांनी 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी' म्हणून 'हाल्या हाल्या दुधू दे' ही एकमेव कादंबरी निवडली. कारण या कादंबरीतले जीवनानुभव अस्सल ग्रामीण आहेत. निवेदनात वऱ्हाडी बोलीचा वापर नैसर्गिकपणे येतो. त्यामुळे शेतकऱ्यांची शोकांतिका चितारणारी ही कादंबरी वास्तववादी आहे. कादंबरीत ज्ञानबा—आनसा या शेतकरी जोडण्याच्या जीवनाची झालेली ससेहोलपट आलेली आहे.

या कादंबरीत विदर्भातला शेतकरी ज्ञानबा आपल्या मुलीच्या लग्नासाठी पाच हजार रुपये हुंडा देतो. एवढा हुंडा देण्याची ज्ञानबाची ऐपत नसते. आनसाचा भाऊ ज्ञानबाचा मेव्हणा शोभाच्या लग्नावेळी फसवितो. इथून पुढे ज्ञानबा—आनसा यांच्या संसारला ग्रहण लागते. मुलीच्या लग्नाला घेतलेले कर्ज फिटत नाही. तर अडीच हजाराला एका वर्षासाठी तीन एकर शेताची खरेदी ज्ञानबा सावकाराला देतो. सावकार त्यातही शेतीच्या खरेदीवरुन ज्ञानबाला मारतो. सावकाराला जमीन मोजून

देण्यासाठी आलेला पांडेबुवा जमीन मोजतांना ज्ञानबाला फसवितो. शोभाच्या सासऱ्याकडून आणलेले बी–बियाणे नापास झालेले असते. फक्त वाढते पण त्याला कापूस येत नाही. त्यामुळे पाणी, खत औषधे यांचा ज्ञानबाचा खर्च वाया जातो. शेतीसाठी आणलेला शोभाच्या सासऱ्याचा बैल पुरात वाहून जातो. त्यातच शोभाच्या कानातले टापूस (दागिना) हरवतो. त्यामुळे शोभाला सासरला जाच सुरु असतो. शोभाचा सासरा शोभावर हात टाकतो. त्यामुळे शोभाचा संसारही सुरळीत चालत नाही. शोभा ज्ञानबाकडे येऊन राहाते. शोभा रस्त्यावरचा साहेब हा शोभाच्या नवऱ्याचा मावसभाऊ असतो तर शोभा नवऱ्याला भेटण्यासाठी त्या साहेबाबरोबर जाते तर रखमा व तिचा नवरा गावातल्या लोकांना सांगून शोभा व साहेब यांना मारायला लावतात. या बदनामीने गावात नाचक्की होईल म्हणून शोभा आसराच्या बारवंत जीव देतें.

ज्ञानबाचा मुलगा प्रकाश शाळेत खेळताना त्याच्या अंगावर मुले पडतात. त्याला मार लागतो तो बेशुध्द पडतो. त्याला अनसिंगला दवाखान्यात न्यावे लागते. तर त्याला घरी आणतात का नाही तर ज्ञानबाला झालेल्या गळयाच्या कॅन्सरने त्याचा मृत्यू होतो. त्याच्या दु:खाने सारे गाव हळहळते. ज्ञानबाच्या जीवनाची शोकांतिका या कादंबरीत सलग प्रसंगांच्या आधारे लेखक मांडतो. हाल्याकडे दूध मागण्याचा परिणाम ज्ञानबाच्या संसाराचा विध्वंस होतो. त्यामुळे या कादंबरीचे शीर्षक योग्य वाटते.

सारांश या कादंबरीत ग्रामीण जीवनाचे चित्रण सलग प्रसंगाधारे लेखक मांडतो. कादंबरीत वऱ्हाडी बोलीभाषेतील संवाद विदर्भातील भाषिक, सामजिक, सांस्कृतिकतेचा प्रत्यय वाचकाला करुन देते. या कादंबरीतील घटना, प्रसंग, पात्रे काल्पानिक असली तरी ती वास्तववादी आहेत.

२) 'पखाल'

ही कादंबरी १९९५ मध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली. या कादंबरीत बाबाराव मुसळे यांनी एका आगळया वेगळया समाजाचे जीवनचित्रण केलेले आहे. या कादंबरीत बलुत्याने पाणी भरण्याचा व्यवसाय करणाऱ्या पुंजाबा कोळयाचा जीवनाचे चित्रण येते.

बदल हा जगाचा नियम आहे. या नुसार बदलत्या खेडयात बलुतेदारांच्या व्यवसायात बदल होत नाही. बलुतेदारांची मानसिकता काळाप्रमाणे बदलत नाही. परिणामी त्यांचा बलुत्याचा धंदा बसतो. तो कसा? याचे सविस्तर वर्णन कादंबरीत लेखक करतो. 'पखाल' मध्ये पुंजाबा—गिरजा हे कोळी समाजाचे दांम्पत्य येते. पुंजाबा पाखलीने सर्व गावाला बलुत्याने पाणी पुरवितो. त्याबदल्यात त्याला धान्य व दररोज प्रत्येक घरी भाकरी मिळते. अशा कितीतरी पिढया या पुजांबा कोळयाचा पखालीने पाणी भरीत आलेल्या असतात.

गावात बदल होतो हापस्या येतात. त्यावेळी पुंजाबा बैचेन होतो. कारण त्याचा पखालीचा धंदा बसायला सुरुवात होते. नंतर गावात ग्रामपंचायत स्थापन होऊन तिच्याद्वारे पाण्यासाठी सार्वजनिक नळयोजना मंजूर होते. तिचे बांधकाम चालू असताना पुंजाबा त्याकडे बघतही नाही. उलट सरपंच व गावातल्या नळयोजना आणणाऱ्या सदस्यांशी भांडण करतो. विरोध करतो. नळयोजनेला गिरजा वर्गणी देते. ते पुंजाला खटकते. पुंजाबा गिरजाला मारतो दगडू पखालीने नळयोजनेच्या बांधकामाला पाणी देतो तर त्यालाही पुंजाबा मारायला जातो. शेवटी आपला पखालीचा, बलुतेदारीचा व्यवसाय बसणार या विवंचनेत पुंजाच्या डोक्यावर परिणाम होतो. दगडूची बायको सुमनच्या पोटात लाथ मारते तिचा गर्भपात होतो या पश्चातापाने पुंजाबा घर सोडून जातो. दगडू नोकरीच्या शोधात मुंबईला जातो. असा कथाभाग कादंबरीस येतो.

सारांश: या कादंबरीत होणारे समाजपरिवर्तन आणि त्याला तोंड देण्यासाठी समर्थ नसणारे आलुतेदार, बलुतेदार यांचे वास्तवजीवनदर्शन येते. कोळी समाजाच्या नशिबी आलेले दैन्य, दारिद्रय, शोषण, उपहास, व्यथा, वेदना, अज्ञान, विज्ञान—तंत्रज्ञानाने बलुतेदारीच्या कुचंबनेचे चित्रण त्यातून व्यक्त होते.

### ३) 'वारुळ' (२००४)

'वारुळ ही एक सामाजिक आणि वास्तववादी कथानक असणारी कादंबरी औरंगाबादच्या साकेत प्रकाशनाने २००४ ला प्रकाशित केली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९५६ साली महारांनी बौध्द समाजाची दीक्षा घेतली ते बौध्द झाले.

त्यांनी सोडलेली गावकीची कामे मातंगांनी राजी खुशीनेच स्वीकारली म्हणून मातंगांची प्रगती २०—२५ वर्षे उशिरा झाली. १९८० ला मात्र डॉ. भोपळेंच्या रुपाने 'अखिल महाराष्ट्र मातंग संघ' नावाची परिवर्तनवादी चळवळ निर्माण झाली आणि मातंग तरुणांत जागृती निर्माण केली. या चळवळीचा विकास कसकसा झाला याचे चित्रण ही कादंबरी करते. मातंग समाजाच्या दोन पिढयांतील बदल व तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व यांचे तपशिलवार चित्रण कादंबरीत होते. महार मांग या समाजातील लोकांचे एकमेकांविषयीचे भेदाभेद, सत्तेसाठी गावपातळीवरील राजकारण इ. तपशिल या कादंबरीत येतो. समाजकारण, राजकारण चळवळ स्वत:च्या हक्कांची दलितांना झालेली जाणीव यातून बदलत जाणारा समाज याचे वास्तव चित्रण यात येते. 'वारुळ' हे प्रतिकात्मक शीर्षक आहे. मातंग लोक व परिवर्तनवादी चळवळीला उद्देशून हे शीर्षक दिले आहे.

सारांश :— 'वारुळ' ही सामाजिक दस्तऐवज ठरावी अशी कादंबरी आहे. म्हणून तिला छोटे मोठे पुरस्कार मिळालेले आहेत. या कादंबरीचा सविस्तर विचार पुढील प्रकरणांमध्ये करणार आहेत.

४) **'पाटीलकी' :—**

'पाटीलकी' ही बाबाराव मुसळेंची कादंबरी प्रतिभास प्रकाशन परभणीने प्रकाशित केली. २००५ ला ती प्रकाशित केली. या कादंबरीत श्रावण ही आदिवासी व्यक्ती हिवरातोरे गावची पोलीस पाटील होते. हे मुळी कुरघोडीचे राजकारण करणाऱ्या गावातल्या लोकांना पटत नाही. राजकारणात पार्टीशन असते. त्याप्रकारे गावात जुन्या पोलीस पाटलाचा भाऊ बाजीराव तोरे आणि सरपंच बाबूराव तोरे यांच्यात पार्टीशन असते. यशवंत पाटलांच्या मृत्यूनंतर गावातले पाटीलपद रिकामेच राहाते. नंतर ते पद आदिवासींसाठी राखीव जाते. सरपंच बाबूराव तोरे हे श्रावणचा अर्ज पोलीस पाटीलकीसाठी भरतात. श्रावण पोलीस पाटील होतो. बाजीरावला आपल्या भावाची पाटीलकी वारसा हक्काने मिळावी व राजकारणाचे शिक्षणही मिळावे असे वाटत होते. ते मात्र श्रावणलाच मिळते.

पाटीलकी मिळाल्यानंतर श्रावणला बाजीराव व त्याचे मित्र पुरासिंग गावातील लोक त्रास देतात. श्रावणच्या बायकोवर बलात्कार करतात. श्रावणचे घर लुटतात. श्रावणला झाडपाल्यांच्या औषधाचे ज्ञान वडिलांपासून मिळालेले होते त्या बरोबर मांत्रिकाचे कामही तो करीत होता. गावातल्या स्त्रियांवर श्रावण करणी करतो असे श्रावणला बदनाम करण्यासाठी गावात बोलले जाते. सरपंचाची बायको ब्लड कॅन्सरने मरते. हे सरपंचालाही माहीत असते तरीही सरपंचाला श्रावण विरुध्द भडकावतात. सरपंचाच्या बायकोच्या माती सावडण्याच्या दिवशी खऱ्या—खोटया गोष्टी समोर येतात. सगळा गाव आपले भेदाभेद विसरुन चांगला होतो.

सारांश: — या कादंबरीत एक आदिवासी व्यक्ती पोलीस पाटील झालेली सर्व गावाला कशी खटकते हे सांगितले आहे. या कादंबरीतले छोटे छोटे प्रसंग कादंबरीला गतिमान करतात. कथानकाला उठावदारपणा येतो. भाषा वऱ्हाडी मिश्रित आदिवासी समाजाची येते. ठिकठिकाणी संवादात्मक लेखनाचा वापर चपखलपणे केलेला आहे.

## ८) समारोप :—

बाबाराव मुसळे यांच्या वाङ्‌मयीन परिचयातून त्यांचे व्यक्तिमत्वाचे पैलू लक्षात येतात. शिवाय विदर्भातल्या इतर साहित्यिकांतही त्यांचे स्थान पाहिले असता आपल्याला त्यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रत्येक पैलू समजतो. विदर्भातल्या १९८० नंतरच्या साहित्यिकांत बाबाराव मुसळे ग्रामीण व दलित साहित्याच्या सीमारेषेवर लेखन करणारे ताकदीचे लेखक म्हणून त्यांच्या पहिल्या कादंबरीने प्रसिध्दीस आले. त्यांच्या साहित्य लेखनाचा प्रवास कविता—कथा—कादंबरी असा आहे. त्यांनी कविता अल्पशीच केली. नंतर कथालेखनाकडे वळले. कथा वाङ्‌मय प्रकारात सभोवतालच्या शिक्षित अर्ध शिक्षित ग्रामीण लोकांच्या सुखदु:खांना शब्दात पकडले, मांडले. १९७१ साली त्यांची 'रक्त' नावाची कथा प्रसिध्द झाली तिथून पुढे एक दशक त्यांनी कथालेखनच केले. अनुष्टुभ, अक्षरवैदर्भी, अस्मितादर्श, अक्षरछाया, 'बळीराजा' ज्वाला इ. मासिकांतून त्यांच्या कथा प्रसिध्द होत होत्या. ग्रामीण साहित्य व जनसाहित्य चळवळींमुळे त्यांची कथा अधिक प्रौढ व गंभीर

बनत गेली. वास्तव जीवनदर्शन घडविण्याने मुसळेंची लेखनी अधिक अंतर्मुख झाली. अनेक ठिकाणी कथा कथनांचे कार्यक्रम त्यांनी केले. कथा वाङ्मयप्रकार त्यांना अपुरा वाटल्याने त्यांनी कादंबरी लेखनास सुरुवात केली. त्यांच्या कादंबऱ्या विविध विषयांवर समाजातील विविध घटकांचे जीवन दर्शन घडवितात. त्यात 'वारुळ' कांदबरीचा अभ्यास आपल्याला निरनिराळया अंगाने पुढच्या प्रकरणात करावयाचा आहे.

## ९) निष्कर्ष :—

१) बाबाराव मुसळे हे विदर्भातले प्रसिध्द लेखक आहेत.

२) ग्रामीण व दलित साहित्याच्या सीमारेषेवर (१९८० नंतरचे) लेखन करणारे लेखक म्हणून बाबाराव मुसळेंना ओळखले जाते.

३) सर्वप्रथम कविता नंतर कथा मग कादंबरी असा बाबाराव मुसळेंचा लेखन प्रवास आहे. कविता त्यांनी अल्पशीच लिहिली.

४) बाबाराव मुसळे यांची पहिली कथा 'दै. आपण' मध्ये प्रसिध्द झाली. १९७०—९० या काळात त्यांनी फक्त कथांचेच लेखन केले. 'रेऊ' कथा स्पर्धेत सलग चार वेळा प्रथम क्रमांक कथेला मिळाला.

५) कथालेखनाने महाराष्ट्रभर प्रसिध्दी मिळाली 'अनुष्टुभ' 'अक्षरवैदर्भी' चे नियमित लेखक होते.

६) दलित कथा लिहिण्याचे भान त्यांना गंगाधर पाणतावणे यांच्यामुळे आले. त्याचबरोबर सामाजिक विषमता आधारित कथालेखन केले. दलितांविषयी सहानुभूती त्यांच्यात निर्माण झाली. त्यामुळे तटस्थ वृत्तीने 'वारुळ' चे लेखन केले.

७) 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी' या स्पर्धात्मक उपक्रमात मुसळेंची १९८३ ला 'हाल्या हाल्या दुधू दे' एकमेव कादंबरी निवडली गेली.

८) परिवर्तनवादी चळवळीचा त्यांचा संपर्क येऊ लागल्याने त्यांना अनेक व्यक्ती भेटल्या, त्यांचा सहवास लाभल्यानेच त्यांची साहित्यिक जडण घडण झाली.

९) विदर्भातल्या भौगौलिक परिसरात असणारी राजकिय, आर्थिक स्थितीगतीचा त्यांच्या जीवनावर कसा परिणाम झाला याचा आलेख म्हणजे मुसळेंचे लेखन.

१०) अमरावती विद्यापीठाच्या बी. ए. भाग २च्या मराठीच्या पाठयपुस्तकात 'दावणीचा बैल' व 'अल्पभूधारक' कथांचा समावेश.

११) 'मोहरलेला चंद्र' हा त्यांचा पहिला कथासंग्रह तर 'हाल्या हाल्या दुधू दे' ही त्यांची पहिली कादंबरी होय.

१२) कथेचा अवकाश जीवनातील अनुभव मांडण्यासाठी अपुरा वाटल्याने कादंबरी लेखनाकडे मुसळे वळले.

१३) मुसळेंची 'वारुळ' ही कादंबरी मातंग समाजाचा इतिहास व वास्तव जाणून घेण्याच्या दृष्टीने 'सामाजिक दस्तऐवज' ठरावी अशी कादंबरी आहे.

# १०) संदर्भसूची :—


| | | | |
|---|---|---|---|
| १) | कुलकर्णी श्री. मा. | — | 'कादंबरीची रचना' उन्मेष प्रकाशन, नागपूर—२, प्रस्तावना पृ. क्र.७, आवृत्ती १९७६. |
| २) | उ. नि. पृ. २. | — | |
| ३) | डॉ. किशोर सानप | — | 'प्रायोगिक कादंबरी आणि श्याममनोहर', बजाज, पब्लिकेशन्स पृ. क्र. १. आवृत्ती पहिली १९९८. |
| ४) | मुसळे बाबाराव यांनी लिहून पाठविलेली दि. २९/११/२००६ रोजीची प्रश्नावली | | |
| ५) | मुसळे बाबाराव | — | 'मोहरलेला चंद्र' (१९९२) मेहता पब्लिशिंग, पुणे. |
| ६) | मुसळे बाबाराव | — | 'झिंगु लिखु लिखु' (१९९४) मेहता प्रकाशन, पुणे. |
| ७) | मुसळे बाबाराव | — | 'हाल्या हाल्या दुधू दे' (१९८५) मेहता पब्लिशिंग, पुणे. |
| ८) | मुसळे बाबाराव | — | 'पखाल' (१९९५) मेहता पब्लिशिंग, पुणे. |
| ९) | मुसळे बाबाराव | — | 'वारुळ' (२००४) साकेत प्रकाशन, औरंगाबाद. |
| १०) | मुसळे बाबाराव | — | 'पाटीलकी' (२००५) प्रतिभास प्रकाशन, परभणी. |